महा मेट्रो

PUNE METRO

**कृषी महाविद्यालय ते बुधवार पेठ (फडके हौद) स्थानकापर्यंत मेट्रोचे दोन्ही भुयारी मार्ग पूर्ण - 'मुळा' टनेल बोरींग मशीनचा आज ब्रेक थ्रू**



पुणे मेट्रोच्या पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेमध्ये शिवाजीनगर ते स्वारगेट या स्थानकादरम्यानचा मार्ग भुयारी असणार आहे. हा मार्ग एकूण ६ किमीचा असून जाण्यासाठी व येण्यासाठी असे २ स्वतंत्र बोगदे असणार आहेत. पुणे मेट्रोच्या भुयारी मार्गाचा टप्पा पूर्ण करण्यासाठी तीन महाकाय टनेल बोरींग मशीनचा वापर करण्यात येत आहे. यापैकी 'मुठा' व 'मुळा' हि दोन टनेल बोरींग मशीन कृषी महाविद्यालय येथून स्वारगेटच्या दिशेने मार्ग बनवित येत असून तिसरे 'पवना' टनेल बोरींग मशीन स्वारगेटकडून बुधवार पेठ स्थानकाकडे टनेल बनवित येत आहे.




मुठा या पहिल्या टनेल बोरींग मशीनने कृषी महाविद्यालय येथून दि. २९/११/२०१९ रोजी टनेल बनविण्यास सुरुवात केली. शिवाजीनगर मेट्रो स्थानक, सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानक इथंपर्यंत भुयार बनविल्यानंतर नदीखालून टनेल बनवत मुठा टनेल बोरींग मशीन दि. २२/०७/२०२१ रोजी बुधवार पेठ (फडके हौद) या स्थानकात पोहचले. दि. ३०/११/२०१९ रोजी निघालेले मुळा टनेल बोरींग मशीन आज दिनांक ३१/०७/२०२१ रोजी दुपारी ४ वा. बुधवार पेठ स्थानकात पोहचत असून 'ब्रेक थ्रू' साधला जात आहे. भुयारी मार्गाचे काम वेगाने सुरु असून स्वारगेट येथून भुयारी मार्ग बनावत असणारे 'पवना' टनेल बोरींग मशीनने दि. १ मार्च २०२१ या दिवशी भुयारी मार्गाच्या कामाला सुरुवात केली होती व आजमितीस हे मंडई स्थानकापर्यंत पोहचले आहे. बुधवार पेठ स्थानकात पोहचलेले मुठा टनेल बोरींग मशीन स्वारगेटला नेण्यात येणार आहे व त्याच टनेल बोरींग मशीनद्वारे स्वारगेट ते बुधवार पेठ येथील उर्वरीत भुयाराचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवडवरून येणार मेट्रोचा उन्नत मार्ग रेंज हिल डेपो जवळ भुयारी मार्गात शिरतो. तेथून शिवाजीनगर हे मेट्रोचे पहिले भुयारी स्थानक ४७४ मी. दूर आहे. त्यानंतर सिव्हिल कोर्ट स्थानक ७७७ मी. अंतरावर आहे. सिव्हिल कोर्ट स्थानकानंतर मुठा नदीखालून भुयारी मार्गाचे बुधवार पेठ (फडके हौद) स्थानकापर्यंतचे अंतर ७०४ मी. आहे. बुधवार पेठ ते मंडई या स्थानकांचे अंतर ८४९ मी. आहे. मंडई ते स्वारगेट या अंतिम चरणाचे अंतर ११८० मी. आहे. अश्याप्रकारे एकूण भुयारी मार्गाची लांबी ६ किमी आहे.